



दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३८ ■ शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -338 ■ Friday, 11 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## तहव्वूर राणाला तिहारमध्ये ठेवणार; एनआयए २६/११ प्रकरणी चौकशी करणार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**



अमेरिकेने तहव्वूर राणाला भारताकडे हस्तांतरित केले आहे. मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याला विशेष विमानाने दिल्लीत आणण्यात आले. तहव्वूर राणाला दिल्लीच्या तिहार तुरुंगात ठेवले जाणार आहे. तिथेच त्याची एनआयएचे अधिकारी कसून चौकशी करणार आहेत. या चौकशीचे नेतृत्व आयपीएसच्या महाराष्ट्र कॅडरचे १९९० च्या बॅचचे अधिकारी सदानंद दाते करणार आहेत.

मुंबईत २००८ मध्ये जेव्हा २६/११ चा अतिरेकी हल्ला झाला त्यावेळी सदानंद दाते अतिरेक्यांच्या विरोधात काम करणाऱ्या एटीएसची जबाबदारी हाताळत होते. त्यांनी कामा रुग्णालयात अतिरेक्यांशी झुंज दिली होती. यामुळे दातेंसाठी तहव्वूर राणाची चौकशी करण्याच्या निमित्ताने २६/११ च्या पीडितांना न्याय देण्याची आणखी एक संधी आहे.

भारतीय न्यायालयात तहव्वूर राणा विरोधात खटला चालवला जाणार आहे. या खटल्यात दोषी आढळल्यास तहव्वूर राणाला कठोरात कठोर शिक्षा दिली जाण्याची शक्यता आहे. तहव्वूर राणाशी संबंधित सर्व खटल्यांसाठी एनआयएकडून नरेंद्र मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातली अधिसूचना काढण्यात आली आहे.

भारताकडे हस्तांतरण होऊ नये यासाठी तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. ही याचिका फेटाळण्यात आली आहे. याआधी मार्चमध्येही त्याने केलेली याचिका फेटाळण्यात आली होती. यानंतर तहव्वूर राणाला भारतात आणण्याची कारवाई सुरू झाली. या कारवाईवर स्थगिती आणण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. पण त्याची स्थगितीची मागणी फेटाळण्यात आली. एबडोमिनल ऑर्टिक एन्युरिझम, पार्किंसन आणि मूत्राशयाच्या कर्करोग असे तीन गंभीर आजार झाल्याचे कारण देत तहव्वूर राणाने अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. भारताकडे हस्तांतरित करण्याची कारवाई स्थगित करावी, अशी मागणी त्याने केली होती. पण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने तहव्वूर राणाची स्थगितीची मागणी फेटाळली. या निर्णयामुळे तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

फेब्रुवारीत पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट झाली होती. या भेटीनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत तहव्वूर राणाला भारताकडे हस्तांतरित करण्याचे संकेत अमेरिकेने दिले होते. तहव्वूर राणा हा पाकिस्तानी-अमेरिकन अतिरेकी डेव्हिड कोलमन हेडलीचा सहकारी आहे, जो २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक होता. तो पाकिस्तानी वंशाचा व्यापारी, डॉक्टर आणि इमिग्रेशन उद्योजक आहे. त्याचे लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेशी तसेच पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयशी संबंध असल्याचे समजते.

अमेरिकेच्या ज्युरीने राणाला हल्ल्यांना भौतिक मदत पुरवल्याच्या आरोपातून ठोस पुराव्यांअभावी मुक्त केले होते. पण त्याला इतर दोन आरोपांमध्ये दोषी ठरवण्यात आले होते. तहव्वूर राणाला दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधीची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. कोविड काळात तब्येत बिघडू लागल्याचे पाहून त्याला तुरुंगातून सोडण्यात आले. नंतर भारताच्या ताब्यात देण्यासाठी अमेरिकेने तहव्वूर राणाला पुन्हा अटक केली. राणाने भारताच्या ताब्यात दिले जाऊ नये यासाठी कायदेशीर प्रयत्न केले. पण अमेरिकेच्या न्यायालयाने त्याची भारताच्या ताब्यात देऊ नये ही मागणी फेटाळून लावली.

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात




भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव समितीच्या द्वारे आयोजित करण्यात आलेल्या शोभायात्रेचे. गुरुवारी भगवान महावीर यांचे जन्म जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ, खा. संदीपान भुमरे, माजी खा. चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, पृथ्वीराज पवार, रशीद मामू, राजेंद्रसिंग जबिंदा, प्रशांत देसरडा, विकास जैन, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी, सहाय्यक पोलीस आयुक्त संपत शिंदे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संजय कांकरिया, अजय शहा, शिवशंकर स्वामी, लक्ष्मीनारायण राठी, सरदार हरिसिंग, जयंत देवळाणकर, अजय मंत्री, विजय जैस्वाल, पंकज लोया, सुभाष शेळके, महावीर पाटणी, स्वप्नील पारख, प्रकाश झांबड, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, रवी मुगदिया, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा, अभिजित हिरप आदी उपस्थित होते.

## आ. प्रदीप जैस्वाल यांच्या करोडी टोल नाक्याजवळील हॉटेलला भीषण आग

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर मध्यचे आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हॉटेलला संध्याकाळी भयंकर आग लागली. मात्र अग्निशमन दलाच्या गाड्या वेळेत घटनास्थळी पोहचल्या.

छत्रपती संभाजीनगर शहरातील धुळे-सोलापूर महामार्गावर करोडी टोल नाक्याजवळ हॉटेलला भीषण आग लागली होती. शिवसेनेचे आमदार प्रदीप जैस्वाल यांचं हे हॉटेल असल्याचं समोर आलं आहे. पण सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, हॉटेलचं प्रचंड नुकसान झालं आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील धुळे-सोलापूर महामार्गावर करोडी टोल नाक्याजवळ हॉटेलला भीषण आग लागली होती. शिवसेनेचे आमदार प्रदीप जैस्वाल यांचं हे हॉटेल असल्याचं समोर आलं आहे. पण सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, हॉटेलचं प्रचंड नुकसान झालं आहे.



संभाजीनगर मध्यचे आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हॉटेलला संध्याकाळी भयंकर आग लागली. मात्र अग्निशमन दलाच्या गाड्या वेळेत घटनास्थळी पोहचल्या आणि आग लगेच आटोक्यात आली. प्रदीप जैस्वाल हे शिवसेना शिंदे गटाचे आमदार आहेत. त्यामुळे पोलीस आयुक्त स्वतः घटनास्थळी पोहचले.

संभाजीनगर मध्यचे आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हॉटेलला संध्याकाळी भयंकर आग लागली. मात्र अग्निशमन दलाच्या गाड्या वेळेत घटनास्थळी पोहचल्या आणि आग लगेच आटोक्यात आली. प्रदीप जैस्वाल हे शिवसेना शिंदे गटाचे आमदार आहेत. त्यामुळे पोलीस आयुक्त स्वतः घटनास्थळी पोहचले.

सुदैवाने या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही. हॉटेलच्या लॉजमध्ये ग्राहक होते मात्र आग लागताच सगळ्यांना सुरक्षित बाहेर पडण्याचा वेळ मिळाला होता.

सुदैवाने या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही. हॉटेलच्या लॉजमध्ये ग्राहक होते मात्र आग लागताच

## पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन लवकरच निघणार



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन लवकर काढण्यात येईल, पत्रकार सन्मान योजनेच्या अटी शिथिल करण्यात येतील असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले..

पत्रकारांच्या दहा संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचच्या वतीने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली .. जनसुरक्षा विधेयकाच्या संदर्भातील आक्षेप आणि शंकाच्या संदर्भात सह्याद्रीवर ही बैठक झाली .. बैठकीस गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते..

बैठकीच्या अखेरीस एस.एम.देशमुख यांनी पत्रकार संरक्षण कायद्याचा मुद्दा उपस्थित केला.

'पत्रकार संरक्षण कायदा झाला पण कायद्याचं नोटिफिकेशन निघाले नसल्याने राज्यात कायदा अंमलात आलेला नाही ही बाब निदर्शनास आणून दिली.. त्यावर मुख्यमंत्र्यांनी लगेच नोटिफिकेशन काढण्याची सूचना गृहसचिवांना केली..

पत्रकार सन्मान योजनेचे नियम अत्यंत जाचक असल्याने बहुसंख्य ज्येष्ठ पत्रकार या योजनेपासून वंचित आहेत.. तेव्हा नियम शिथिल करण्याची मागणी एस.एम.देशमुख यांनी केली त्यावर मुख्यमंत्र्यांनी त्यासंबंधीच्या सूचना संबंधीत अधिकारयांना दिल्या...

### सप्तश्रृंगी गडावर गर्दीचे नियोजन हुकले, पोलिसांची तारांबळ

## भद्रा मारुतीचे मंदिर २८ तास खुले:एक किमी रांगेतून दर्शनास लागेल दीड तास, भाविकांची संख्या असेल दुप्पट, यंदा ११ लाखांचा अंदाज

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त भाविकांसाठी भद्रा मारुती मंदिर २८ तास सुरू ठेवण्यात येणार आहे. दर्शनासाठी शुक्रवारी (११ एप्रिल) रात्री दहापासून भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा सुरू होतील. एक किलोमीटरपर्यंतच्या रांगेत उभे राहून दीड तासानंतर दर्शन मिळेल, असा अंदाज आहे. यावर्षी सुमारे ११ लाख भाविक दर्शनासाठी येतील. त्यादृष्टीने मंदिर संस्थानने व्यवस्था केली आहे. भाविकांना एक किमी रांगेतून दर्शनासाठी दीड तास लागेल.

मंदिर परिसरात ४० सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवली जाणार आहे. शनिवारी पहाटे ४ वाजता महापूजेला सुरुवात होईल. सकाळी ६ वाजता महाआरती होईल. त्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगताप्रसंगी सकाळी ९ ते ११ दरम्यान ह.भ.प महंत रामगिरीजी महाराज (सरला बेट) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे, अशी माहिती भद्रा मारुती संस्थांनचे अध्यक्ष मिठ्ठू बारगळ यांनी दिली आहे.

दरम्यान, भाविकांच्या सुरक्षेसाठी सुमारे १ हजार पोलिसांचा बंदोबस्त असेल. गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट बंदोबस्त तैनात केला आहे. खुलताबाद येथे भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी राज्यभरातून भाविक दाखल होतात. यंदा ११ एप्रिल रोजी रात्री दहापासून दर्शनाला सुरुवात होणार आहे.

शनिवारी पहाटे ४ वाजता भद्रा मारुतीच्या महापूजेला सुरूवात होईल. यावेळी संस्थांनचे अध्यक्ष मिठ्ठू बारगळ, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्यासह आदींची उपस्थिती असेल.

३० किलो शेंदुराने प्रतिकृती नवसाला पावणाऱ्या भद्रा मारोतीच्या दर्शनासाठी दरमहा हजारो भाविक येतात. मारोतीला शेंदूरही वाहतात. मंदिर संस्थानही दररोज मारोतीला अभिषेक करुन शेंदूरलेपन करते. ठराविक कालावधीनंतर हे लेपन काढावे देखील लागते.

२०१९ मध्ये भद्रा मारुतीचे ३५० किलो शेंदूर लेपन काढण्यात आले. त्यातून ३० किलो शेंदूर घेऊन भद्रा मारोतीची प्रतिकृती साकारण्यात आली. शुक्रवारी सकाळी १० ते मध्यरात्री ३ पर्यंत अभिषेक शुक्रवारी सकाळी १० वाजता पूजनानंतर अभिषेकाला सुरुवात होईल. अन मध्यरात्री ३ पर्यंत भाविक अभिषेकासाठी येतात. त्यानंतर शेंदूर लेपन आणि जन्मोत्सव सोहळा होणार आहे. यानंतर आरती झाल्यावर दिवसभर दर्शनरांगा असतील. भद्रा मारुतीला पहाटे ४ वाजता अभिषेक केला जाईल.

स्थानिक मार्गात बदल

औरंगजेबाच्या कबरीच्या वादामुळे स्थानिक मार्गात काही अंशी बदल करण्यात आला आहे. पायी जाणाऱ्या भाविकांसाठी खुलताबाद नाक्यापासून शहरात प्रवेश करता येईल. त्यानंतर लुहजी साळवे चौक ते औरंगजेब कबर आणि भद्रा मारूती मंदिर, असा मार्ग बंद असेल.

भाविकांसाठी नाक्यापासून -लहुजी साळवे चौक-स्टार कॉलनी-लहानी आळी- मोठी आळी-भद्रा मारुती मंदिर हा मार्ग सुरू असेल. नाक्यापासून-वेरूळ घाट चौक-जुने बस स्टॉप असा.

## आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा

### जिल्ह्यातील ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उन्हाच्या झळा वाढल्या असून, कमाल तापमान ४० अंशावर जात आहे, तसेच पुढील तीन महिने तापमानाचा पारा वाढणार असून नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान वाढत्या तापमानामुळे होणाऱ्या आजारांवर उपचारासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग सतर्क झाला असून मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी जिल्ह्यातील सर्व ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष स्थापन करून तेथे पुरेसा औषधसाठाही ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यात सर्वसाधारणपणे दरवर्षी एप्रिल ते जून या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होतो. तसेच त्यामुळे मृत्यू होणेही संभव असते. त्यातच आतापासूनच जिल्ह्यातील कमाल तापमान वाढत चालले आहे. जिल्ह्यातील तापमानाचा पारा ४० अंशावर जात आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताच्या प्रकोपापासून वाचण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. त्यासाठी नागरिकांना जागरुक करण्यासाठी खालील माहिती देण्यात आली आहे.

**उष्माघाताची लक्षणे**

१. उन्हाळ्यात शरीराचे तापमान वाढल्यास त्याला उष्माघात म्हणतात.

२. मळमळ, उलटी, ताप, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, थकवा, चक्कर येणे, डोकेदुखी या तक्रारी सुरू होतात.

३. मनाची स्थिती बिघडते, व्यक्ती असंबंध बडबड करते, चिडचिड करते. जीभ जड होते, जास्त घाम येतो, पायात गोळे येतात.

४. पोटऱ्यात वेदना किंवा पेटके येणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुद्धावस्था.

उष्माघाताची कारणे

उन्हाळ्यात शेतात किंवा इतर मजुरीची कामे फार वेळ करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये तसेच काच कारखान्यात काम, अधिक तापमानाच्या खोलीत काम, घट्ट कपड्याचा वापर.

**प्रतिबंधात्मक उपाय**

दर तासाला १ ते दीड ग्लास पाणी प्यावे. लिंबू सरबत, शहाळे, फळांचा ताजा रस, पन्हे, कोकम सरबत, ताक, लस्सी असे द्रवपदार्थ घ्यावेत. आराम करावा, सैलसर, फिक्कट रंगाचे किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हाळ्याची चाहूल लागली की वाढत्या तापमानात फारवेळ कष्टाची कामे टाळणे. कष्टाची कामे सकाळी किंवा सायंकाळी कमी तापमानात करणे, जलसंजीवनीचा वापर, भरपूर पाणी प्यावे, सरबत प्यावे, उन्हामधील काम अधूनमधून थांबवावे, सावलीत विश्रांती घ्यावी, उन्हात बाहेर जाताना काळ्या काचेचा चष्मा, डोक्यास उन लागू नये म्हणून टोपी, टॉवेल, फेटा, उपरणे यांचा वापर करावा. गरज नसेल तर उन्हात बाहेर फिरू नये. जर बाहेर जावे लागलेच तर उन्हापासून संरक्षण होईल याची काळजी घ्यावी.

**नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी. उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास वैद्यकीय सल्ल्यासाठी किंवा निदानासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घ्यावा. लहान मुले, ज्येष्ठांनी विशेष काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर. डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.**

प्राथमिक उपचार

उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास प्रथम भरपूर पाणी प्यावे. उन्हातून आल्यानंतर थोडावेळ बसा आणि नंतर ग्लासमध्ये पाणी ओतून प्या, खूप थंड, बर्फ टाकलेले पाणी पिऊ नये, रुग्णास वातानुकूलित किंवा मोकळ्या हवेशीर खोलीत ठेवणे. खोलीत पंखे, कुलर असावेत. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे, आइस पॅक लावणे, आवश्यकतेनुसार सलाइन देणे. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**आरोग्य विभागाची सज्जता**


उष्माघात रुग्णास सलाईन द्वारे औषधी मात्र देण्यात येऊन प्राथमिक स्तरावरील उपचार करण्यात येतात. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने उष्णतेची निगडित आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. आणि उष्माघाताच्या रुग्णसंखेत वाढ होऊ नये यासाठी उष्माघात प्रतिबंध उपाय योजना अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले असून, जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला.

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात एक खाट उष्माघात रुग्णासाठी राखीव ठेवण्यात आली असून, उष्माघात कक्षामध्ये हवा खेळती राहील, खिडक्या व दरवाजे मोकळे असतील, कक्षामध्ये कुलर, पंखा एसी इ. पैकी २४ तास चालू स्थितीत उपलब्ध राहील, पुरेसे पिण्याचे थंड पाणी उपलब्ध राहील, तापमान नियंत्रण आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून दिली जावी, ORS द्रावण पाकीट उपलब्ध असावे, आईस पॅक उपलब्ध असतील, उष्माघात कक्षा बद्दलची माहिती संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ निर्देशित करण्यात येईल, उष्माघात कक्षा हा २४ तास कार्यरत ठेवण्यात येईल.

# महात्मा फुले: शेतकऱ्यांचे कैवारी

### (११ एप्रिल: महात्मा जोतीराव फुले जयंती विशेष.)

महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म दि.११ एप्रिल १८२७ रोजी झाला. हे एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, विचारवंत, समाजसेवक, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांना महात्मा फुले आणि जोतिबा फुले म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. सप्टेंबर १८७३मध्ये त्यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संघटना स्थापन केली. त्यांनी स्त्रियांच्या आणि मागासलेल्या आणि अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अनेक कामे केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण देण्याचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. ते भारतीय समाजात जात-आधारित विभाजन आणि भेदभावाच्या विरोधात होते.



स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. म.फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले. १९व्या शतकात महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. फुले यांना स्त्री-पुरुष भेदभावापासून वाचवायचे होते. त्यांनी पुण्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा बांधली. त्यावेळच्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेमुळे फुले खूप व्यथित आणि दुःखी झाले होते, म्हणूनच त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी स्वतः त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या.

सुरुवातीचे जीवन: महात्मा ज्योतिबा फुले एका वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपूर्वी साताऱ्याहून पुण्यात आले आणि फुलांचे गजरे बनवू लागले. त्यामुळे माळीच्या कामात गुंतलेली ही माणसे 'फुले' म्हणून ओळखली जायची. ज्योतिबांनी काही काळापूर्वीपर्यंत मराठीतून शिक्षण घेतले, ते सोडून दिले आणि नंतर वयाच्या २१व्या वर्षी इंग्रजीमध्ये सातवीचे शिक्षण पूर्ण केले. सन १८४०मध्ये त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला, त्यानंतर त्या स्वत: प्रसिद्ध समाजसेविका झाल्या.

पती-पत्नी दोघांनीही दलित आणि स्त्री शिक्षण क्षेत्रात एकत्र काम केले. ते एक कष्टकरी आणि सामाजिक कार्यकर्ता होते.

कार्यक्षेत्र: त्यांनी विधवा आणि महिलांच्या कल्याणासाठी खूप काम केले, त्यासोबतच त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठीही खूप प्रयत्न केले. ज्योतिबांना संतांची चरित्रे वाचण्याची खूप आवड होती. जेव्हा देवासमोर सर्व स्त्री-पुरुष समान असतात, तेव्हा उच्च-नीच असा भेद का असावा, हे त्यांना कळून चुकले होते. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी फुले यांनी सन १८४८मध्ये शाळा उघडली. या कामासाठी देशातील पहिली शाळा होती. मुलींना शिकवण्यासाठी त्यांना शिक्षक मिळाला नाही, म्हणून त्यांनी स्वतः काही दिवस हे काम करून पत्नी सावित्री फुले यांना पात्र बनवले. काही लोकांनी सुरुवातीपासूनच त्यांच्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, पण फुले पुढे सरकत असताना त्यांनी वडिलांवर दबाव आणून पती-पत्नीला घराबाहेर काढले, यामुळे त्यांचे काम काही काळ थांबले, पण लवकरच त्यांनी मुलींसाठी एकामागून एक तीन शाळा उघडल्या.

महात्मा पदवी: गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी सन १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून सन १८८८मध्ये मुंबईत एका विशाल सभेत त्यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली.

ज्योतिबांनी ब्राह्मण-पुरोहिताविना विवाह विधी सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. ते बालविवाहाच्या विरोधात होते आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक होते. आपल्या हयातीत त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजी, राजा भोसलेंचा पवाडा, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांचा टाहो अशी अनेक पुस्तकेही लिहिली. महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने 'कृषी कायदा' मंजूर केला. धर्म, समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.

सन १८८३मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी, त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने 'स्त्री शिक्षणाचे जनक' म्हणून गौरवले. दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी पुणे येथे त्यांचे दुःखद निधन झाले.

// पावन जयंतीपर्वावर म. राष्ट्रपितामह जोतीराव फुलेजींना शतदा विनम्र अभिवादन.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# शेकहॅन्ड फाउंडेशनतर्फे निराधार महिलांना साहित्य वाटप

### पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सोडवला घरकुलाचा प्रश्न

**संजय धारासूरकर, सेलू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या शेकहॅन्ड फाउंडेशनच्या वतीने जिल्ह्यातील निराधार महिलांना गिरणी,शेळी,शिलाई मशीनचे वाटप पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त अनोख्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



आजकाल वाढदिवस म्हटलं की सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध पोस्टद्वारे,बॅनरबाजी करून अथवा पद्धतीने साजरा करतात.परंतु या सर्व गोष्टीला फाटा देऊन शेक हॅन्ड फौंडेशन चे सागर शिंदे यांनी पालकमंत्री परभणी तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनातून पाच निराधार महिलांना उदरनिर्वाहाचे साधन दिले. सर्व साधने महिलांना त्यांच्या मागणीनुसार देण्यात आली.यामध्ये कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी साधने मोफत वाटप करण्यात आले.यावेळी भोगाव व मानधनी येथील निराधार महिलांनी त्यांना घरकुल नसल्याचे सांगितले त्यावेळी मेघना बोर्डीकर यांनी तात्काळ घरकुल मंजूर करून प्रस्ताव पाठवण्याचे OSD यांना सांगितले. यावेळी सर्व महिलांना व त्यांच्या मुलांना कपडे देखील देण्यात आले.

सदरील कार्यक्रमासाठी एन.डी.देशमुख व सेलू येथील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी शेक हॅन्डच्या सागर शिंदे,श्री के बा विद्यालयातील जेष्ठ शिक्षक संजय धारासूरकर,दिलीप बेदरकर,नरेंद्र झालटे,कृष्णा पांचाळ,विकास पांचाळ,परमेश्वर सिराळ,शरद लोहट आदींनी परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महासमितीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

निराला बाजार, ओल्ड केएफसी बिल्डिंग, मोतीवाला कॉम्प्लेक्स येथे असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३४ वी जयंती उत्सव महासामितीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमितीच्या कार्यालयाचे उदघाटन माजी केंद्रीय अर्थ व वित्त नियोजन मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१०) करण्यात आले.

यावेळी इतर मागास बहुजन कल्याण व दुग्ध विकास, अपारंपरिक ऊर्जा विभाग मंत्री अतुल सावे, माजी मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड, आमदार प्रदीप जैस्वाल, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमितीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ शिंदे, उत्सव महासमितीचे अध्यक्ष विजय मगरे, मुख्य सल्लागार मिलिंद दाभाडे, मुख्य समन्वयक गौतम खरात, गौतम लांडगे, कार्याध्यक्ष महेंद्र सोनवणे, स्वागतध्यक्ष चंद्रकांत हिवराळे, वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष भिंगारे, रामभाऊ पेरकर, भन्ते नागसेन, शीख समाजाचे धर्मगुरू खडकसिंह, पृथ्वीराज पवार, इकबाल सिंग गिल, बंडू कांबळे, जालिंदर शेंडगे, बबन नरवडे, गोकुल मलके, मुकुल निकाळजे, संदीप जाधव, डॉ. कुणाल खरात, शिवाजी दांडगे, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे, यांची उपस्थिती होती.

छत्रपती संभाजीनगर मध्यचे आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हॉटेलला संध्याकाळी भयंकर आग लागली. त्यामुळे त्यांना कार्यक्रम अर्धवट सोडून जावे लागले.

# गिबलीच्या ट्रेंडचा सोशल मीडियावर धुमाकूळ; तरुण पिढीने दक्ष असणे गरजेचे



**सेलू (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सोशल मीडियावर फेसबुक,व्हाट्सएप,इन्स्टाग्राम ,ट्वीटर आदींसह अनेक साधने उपालब्ध असतांना सध्या सर्व सोशल मीडियावर गिबली इमेज ने धुमाकूळ घातला आहे.यामध्ये तरुण पिढीचा जास्त कल दिसत असून याचा वापर करावा की नाही याबाबत मतमतांतरे दिसून येत आहे.यामध्ये लोक स्वतःची, कुटुंबाची ,मित्रपरिवारांची गिबली इमेज तयार करत आहेत.ही इमेज तयार करण्यासाठी चॅट जीपीटीवर एआय वापर केला जात आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गिबली इमेज तयार करण्यासाठी आपल्याला आपला फोटो एआय सोबत शेअर करावा लागतो.

पण इथे विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, एआय आपल्या फोटोचा गैरवापर तर करत नाहीये ना! मागील काही घटनांचा विचार केला तर अशी देखील प्रकरणे समोर आली आहेत तिथे लोकांच्या फोटो वरून त्यांची ओळख चोरून ती विकण्यात आली आहे.

त्यामुळे गिबली इमेज ने लोकांना कितीही वेड लावल असल तरी त्याचा वापर किती योग्य आणि सुरक्षित याबाबत शंकाच आहे. फेसबुक असो इन्स्टाग्राम असो किंवा इतर सोशल मीडिया, लोक त्यांचे गिबली इमेज सर्वत्र शेअर करत आहेत .लोक ही इमेज तयार करण्यासाठी केवळ एआय सोबत स्वतःचे फोटो शेअर करत नाहीत तर ते आपल्या कुटुंबाचे, अगदी लहान मुलांचे फोटो देखील शेअर करत आहेत. पण लोकांना माहित नाही की असे करून ते केवळ त्यांच्या फोटोंचा डेटा एआय कंपन्यांसोबत शेअर करत नाहीत तर नकळत त्यांच्या चेहऱ्यांची ओळख देखील त्यांना देत आहेत. तेव्हा विचार करणे आणि वेळीच सावध व्हायला हवे अनेक ट्रेंड्स येतात. पण येणाऱ्या ट्रेंडच्या मागे लागत असताना ते योग्य की अयोग्य याचाही आपण सारासार विचार करायला हवा अशीही चर्चा समाजात होत आहे. शेवटी आपण माणूस आहोत प्राणी नाही हाही विचार तरुण पिढीने करणे आवश्यक आहे.

### चांगले -वाईट याचा विचार तरुण पिढीने करावा -कीर्ती राऊत

– मला नेहमीच असे वाटते की आपण जगाच्या मागे अगदी डोळे झाकून चालतो.पण ते चांगले की वाईट,योग्य की अयोग्य याचा विचार करणे आपण सोडून दिले आहे. संत महंतांची भूमी आपण आपल्या देशास म्हणत असतांना संतांच्या विचारांचा आपल्याला विसर पडल्याचे दिसून येते आहे.सोशल मिडियाचे अंधानुकरण करण्यापेक्षा सतर्क राहून उघड्या डोळ्यांनी अनुकरण करा.चांगले तेच घ्या, सारासार विचार करायला शिका.अशा गिबली येतील आणि जातील. तेव्हा वेळीच सावध व्हा. सतर्क रहा ,सावधान रहा असे मत सहशिक्षिका कीर्ती राऊत यांनी व्यक्त केले आहे.

# सामाजिक उपक्रमांनी भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव २०२५ साजरा








**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही... जय गुरू मिश्री युवा मंडळ, जैन सोशल ऑर्गनायझेशन छ. संभाजीनगर, महावीर इंटरनॅशनल छ. संभाजीनगर या तीनही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १२ वर्षांपासून भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त भव्य वाहन रॅलीचे आयोजन तसेच जैन समाजातील गुणवंत व प्रतिभावान व्यक्तींचा सन्मान हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे.

या सन्मानामुळे –आत्मविश्वास वाढतो. कार्याची समाजात दखल घेतली जाते. गुलमंडी येथे उभारलेल्या भव्य मंचावर सन्मान केला जातो. तरुण पिढीला प्रेरणा मिळते. संस्थांमार्फत वर्षभर राबवले जाणारे उपक्रम – अन्नदान, रक्तदान, निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिरे, या संस्थांचे कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक असून, संपूर्ण सकल जैन समाज या कार्याचे मनःपूर्वक कौतुक करत आहे. या माध्यमातून जैन समाजातील युवक–युवतींना समाज व साधू–संतांशी जोडण्याचे पवित्र कार्य निरंतर सुरू आहे.

मार्गदर्शक –प्रकाशजी मुग्दिया, प्रेरणादायी नेतृत्व –श्री. सागर भाऊ मुग्दिया (काँग्रेस पार्टी, छ. संभाजीनगर),

जय गुरू मिश्री युवा मंडळ– अध्यक्ष – कुतिलाल भाऊ हिरण, सक्रिय कार्यकर्ते – स्वप्नील सकलेचा, हितेश कांकरिया, अजिंक्य शिंगवी, योगेश रनवाल, जयंतिलाल मुग्दिया, शुभम मुग्दिया, गौरव बोरा, पृथ्वी अमर चोरडिया, पियुष मांडलेचा, शुभम गुगले

जैन सोशल ऑर्गनायझेशन महाराष्ट्र अध्यक्ष – कुलदीप भाऊ बाफना या सर्वांच्या सहकार्याने, सामाजिक, आध्यात्मिक आणि जीवदया क्षेत्रातील कार्य या वर्षीही संपूर्ण जोशात आणि निष्ठेने सुरू.

# २५ साल बेमिसाल या टॅग लाईन अंर्तगत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा

## जैन समाज बांधवच नव्हे तर शहरातील सर्व समाज बांधवांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवुन एकात्मतेचे आणि आपुलकीचे दर्शन घडविले. 'महावीर बोलो महावीर बोलो'च्या जयघोषाने शोभायात्रेत वेधले लक्ष





**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'महावीर बोलो महावीर बोलो'च्या जयघोषाने तमाम संभाजीनगरकरांचे लक्ष वेधले गेले, निमित्त होते गुरुवारी(१०एप्रिल) भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव समितीच्या द्वारे आयोजित करण्यात आलेल्या शोभायात्रेचे. गुरुवारी भगवान महावीर यांचे जन्म जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्त शहरात विविध ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते मुख्य आकर्षण यानिमित्त निघालेल्या शोभायात्रेचे होते.

यावेळी ढोल, बँड पथकांच्या गजरात भगवान महावीर यांचा जयघोष करण्यात आला. यावेळी महावीर बोलो स्वामी महावीर बोलो...! अशा गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाहून निघाला. यावेळी केवळ जैन समाज बांधवच नव्हे तर शहरातील सर्व समाज बांधवांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवुन एकात्मतेचे आणि आपुलकीचे दर्शन घडविले. हजारोंच्या संख्येने महावीर भक्तानी उपस्थिती लावून हा उत्सव यशस्वी केला.

**'२५ साल बेमिसाल' टॅग लाईन**

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने गुरुवारी सकाळी सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीच्या वतीने सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रम झाले. सकाळपासूनच भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. आज सकाळी २५ साल बेमिसाल या टॅग लाईन अंर्तगत भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा करण्यात आला.

**शोभायात्रेआधी ध्वजारोहण व वाहन रॅली**

–गुरुवारी सर्व प्रथम सकाळी राजाबजार जैन मंदिर, महावीर भवन, सिडको एन ३ पासुन सकाळी ६ वाजता वाहन रॅली निघाली.जय गुरू मिश्री युवा मंडळ,

जैन सोशल ऑर्गनायझेशन छ. संभाजीनगर,महावीर इंटरनॅशनल छ. संभाजीनगरया तीनही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ही रली निघाली.

–भगवान महावीर चौक बाबा पेट्रोल पंप येथे सकाळी ७ वाजता महावीर पाटनी व स्व नील पारख याचा धर्मध्वजोराहण झाले.

– धर्मध्वजोराहणप्रसंगी जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख,कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस, मिठालाल कांकरीया, ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला,डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, मिनाश्री उदगीरकर, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, विकास जैन, प्रशांत देसरडा, झुंबरलाल पगारिया,अनिलकुमार संचेती,कौशीक सुराणा, मुकेश साहुजी,अमोल पुर्णे कर, रतिलाल मुगदिया, अ‍ॅड. डी.बी.कासलीवाल, डॉ.प्रकाश झांबड विलास साहुजी,संजय संचेती,रवि मुगदिया,मदनलाल आच्छा,वृषभ कासलीवाल,विनोद बोकडिया,निलेश सावलकर, भारती बागरेचा,राजेश मुथा, निलेश पहाडे, करफ्णा साहुजी, भावना सेठीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, महेंद्र जैन, रापराज सुराणा, आनंद दुग्गड, हर्षल साहुजी, प्रफुल्ल सोनटक्के, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, सकल जैन समाजाच्या मान्यवर भगवान महावीर चौक येथे उपस्थित होते.



–७.१५ वाजता उत्तमचंद जैन छात्रालय येथे व गुरूगणेशनगर येथे ध्वजारोहण झाले.

**शोभायात्रेस सुरुवात** – सकाळी ८ वाजता पै'णगेट येथुन भव्य रथयात्रा प्रारंभ झाला. रथयात्रेमध्ये शंखेश्वर पार्श्वनाथ जैन मंदिर सिडको,गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर जोहरीवाडा,विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी यांचे रथ सामील झाले होते.

राजाबजार जैन मंदिर, सराफा व हडको जैन मंदिर, सकल सैतवाल दिगंबर जैन समाज या मंदिराची पालखी होती. ही शोभायोत्रा पै'णगेट, टिळकपथ, मछलीखडक, सिटीचौक, शहागंज, गांधीपुतळा, राजाबजार मार्गाने जैन मंदिरात गेली. महामस्तकाभिषेक झाला. रक्तदान शिबिरशिबिरासाठी डॉ. प्रकाश झांबड, डॉ. प्रकाश पाटणी, डॉ. महेंद्र जैन, डॉ. शैलेश चांदीवाल, डॉ. तुषार चुडीवाल, डॉ. किशोर जैन, पारस ओस्तवाल, नरेंद्र खटोड, नीतीन गंगवाल, सन्मती ठोले आदींनी परिश्रम घेतले.

श्री भगवान महावीर जयंतीनिमित्त मागील २५ वर्षापासून सातत्याने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे महावीर जन्मोत्सव निमित्त श्री सरस्वती भवन शाळेच्या मैदानावर आयोजित एकूण १८१ रक्तदात्यांनी स्वयंपूर्ण रक्तदान केले यावर्षीच्या पंधरवड्यात एकूण ४६१ रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आले या शिबिरासाठी लायन्स ब्लड बँक अमृता ब्लड बँक एमजीएम ब्लड बँक सत्यसाई ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख डॉक्टर प्रकाश झांबड आणि डॉक्टर प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर संपन्न झाले या शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉक्टर महेंद्र जैन डॉक्टर शैलेश चंदिवाल डॉक्टर नरेंद्र खटोड डॉक्टर के के जैन डॉक्टर भरत संगवी यांचे सहकार्य लाभलेशिबिरासाठी डॉ. प्रकाश झांबड, डॉ. प्रकाश पाटणी, डॉ. महेंद्र जैन, डॉ. शैलेश चांदीवाल, डॉ. तुषार चुडीवाल, डॉ. किशोर जैन, पारस ओस्तवाल, नरेंद्र खटोड, नीतीन गंगवाल, सन्मती ठोले आदींनी परिश्रम घेतले.

**अन्नदान** – समाधिस्त १०५ सुव्रतमाताजी यांच्या आर्शीवादाने विजय, जितेंद्र, नितीन, नविन, पाटणी परिवार यांच्या वतीने घाटी येथे अन्नदान करण्यात आले.

**ही सोय करून सेवा**– शोभा यात्रा व रथयात्रा मार्गावर महावीर भक्तांनी व विविध मंडळांनी थंड पेय,बिस्कीट,चॉकलेट ,आईस्किम जलपान व्यवस्था ठेवली.

या राजकीय नेत्यांची व विविध मान्यवर मंडळींची होती उपस्थिती– प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाठ, खा. संदीपान भुमरे, माजी खा. चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, पृथ्वीराज पवार, रशीद मामू, राजेंद्रसिंग जबिंदा, प्रशांत देसरडा, विकास जैन, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी, सहाय्यक पोलीस आयुक्त संपत शिंदे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संजय कांकरिया, अजय शहा, शिवशंकर स्वामी, लक्ष्मीनारायण राठी, सरदार हरिसिंग, जयंत देवळाणकर, अजय मंत्री, विजय जैस्वाल, पंकज लोया, सुभाष शेळके, महावीर पाटणी, स्वप्नील पारख, प्रकाश झांबड, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, रवी मुगदिया, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा, अभिजित हिरप आदी उपस्थित होते.

वर्धमान नागरी पतसंस्थेच्या वतीने स्वच्छता मोहीम

शोभायात्रेत व शोभायात्रेनंतर वर्धमान नागरी पतसंस्थेच्या वतीने हातात झाडू घेत स्वच्छता करत स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. संपुर्ण कार्यक्रमासाठी महासचिव महावीर पाटणी, विकास जैन, प्रशांत देसरडा, झुंबरलाल पगारिया, अनिलकुमार संचेती, कौशीक सुराणा, मुकेश साहुजी, अमोल पुर्णेकर, रतिलाल मुगदिया, अ‍ॅड.डी.बी.कासलीवाल, डॉ. प्रकाश झांबड, विलास साहुजी, संजय संचेती, रवि मुगदिया, मदनलाल आच्छा, वृषभ कासलीवाल, विनोद बोकडिया, निलेश सावलकर, भारती बागरेचा, राजेश मुथा, निलेश पहाडे, करूणा साहुजी, भावना सेठीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, महेंद्र जैन, रूपराज विशाल साहुजी सुराणा, आनंद दुग्गड, हर्षल साहुजी, प्रफुल्ल सोनटक्के, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा विशाल साहुजी यांच्यासह सकल जैन समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

### सजीव देखावे शोभायात्रेतील मुख्य आकर्षण

शहरातील विविध भागातुन विविध मंडळातर्फे सजीव देखावे काढणायत आले 'स्वच्छ भारत','आत्महत्याग्रस्त शेतकरी','पुरग्रस्तांना केलेली मदत व त्यांचे केलेले पुर्नवसन','शहीद जवानांना दिलेली मदत',' पर्यावरण ', '',बेटी बचाव, पशुधन बचाव,वृक्षारोपण आदी विषयाचे हे सजीव देखावे होते.लेझीम पथक,झांझ पथक,महिला व्दारे विविध घोषणा देण्यात आल्या. शोभायात्रेत श्री.शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय सिडको एन–३ रथ, श्री.पार्श्वनाथ खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर राजाबजार पालखी, श्री.अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सराफा श्री.सैतवाल दिगंबर जैन समाज भाजीबाजार येथुन भव्य पालखी तसेच श्री आनंदजी कल्याणजी ट्रस्ट चे श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन श्श्वेतांबर मंदिर जोहरीवाडा येथुन रथ व छत्रपती संभाजीनगर श्री.जैन श्श्वेतांबर मुर्तीपुजक संघ रथ, विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी यात्रेत सामील झाले होते.

## ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे मासिक चर्चासत्र वरुडीत उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जालना जिल्ह्यातील ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे एप्रिल महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र बुधवार (दि. ९ एप्रिल ) रोजी बदनापूर तालुक्यातील मौजे वरुडी येथे अत्यंत उत्साहात पार पडले.

वरुडी येथील शेतीनिष्ठ शेतकरी श्री. जयकिसन शिंदे हे विकतच्या पाण्यावर उत्कृष्टरित्या जोपासत असलेल्या डाळिंब बागेत शिवारफेरी घेऊन तेथेच चर्चासत्राला सुरुवात करण्यात आली. यावेळी आत्मा जालनाचे उपप्रकल्प संचालक श्री. अमोल आगवान, बदनापूरच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख श्री. डॉ. सचिन सोमवंशी,

उद्यानविद्या विषय विशेषज्ञ डॉ. दिपक कच्छवे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिल्यास वेगवेगळ्या पिकाचे वेगवेगळे क्लस्टर करून जिल्ह्यातील सर्व पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी विभागातर्फे पूर्णपणे मार्गदर्शन करण्यात येईल असे श्री. अमोल आगवान यांनी सांगितले.

डॉ. सोमवंशी यांनी पीएम प्रणाम योजना विषयी माहिती देऊन मातीचे आरोग्य जपण्यासाठी नैसर्गिक शेतीची आवश्यकता विषद केली. डॉ. दिपक कच्छवे यांनी उन्हाळ्यात फळबागेत कमीत कमी रसायणाचा वापर, पाणी बचत, मल्चिंग, तुषारचा वापर, सरी वरंबा आड पाणी आदिची शिफारस केली.

ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख संजय मोरे पाटील, कृषी विज्ञान केंद्र बदनापूरचे श्री. कैलास सुदेवाड, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, माळी टाकळीचे श्री. गणेश बुरकूल, वडगाव वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, सपकाळ जळगावचे श्री. दिलीप सपकाळ, कल्याणी करजगांवचे श्री. संतोष बोरसे, बाजार गेवराईचे श्री. कृष्णा कान्हेरे, वाकूळणीचे श्री. सोमनाथ अवघड, बाजार वाहेगावचे श्री. बळीराम काळे, शेख जाकीर पटेल, वरुडीचे श्री. जयकिसन शिंदे, श्री. बाबासाहेब शिंदे, श्री. रमेश शिंदे, भाष्कर शिंदे, श्री. काकासाहेब काकडे या सर्वांनी आपले शेतीविषयक वेगवेगळे अनुभव सांगितले. पुढील महिन्यातील ९ मे चे नियमित मासिक चर्चासत्र नळिवहिरा येथे घेण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले असून मिरची व दादा लाड तंत्रज्ञानातून कपाशीची सघन लागवड व फळबाग लागवडीचे नियोजन ह्या विषयावर या चर्चासत्र कार्यक्रमात सखोल उहापोह करण्याचे यावेळी ठरले.

## सैन्यदल भरती ऑनलाइन सामाईक प्रवेश; परीक्षेसाठी दि.२५पर्यंत नोंदणी मुदत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सैन्य भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठी (उएए) व भरती रॅली २०२५-२६ साठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत आता दि.२५ एप्रिल २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. ही परीक्षा भारतीय सैन्यभरतीच्या संदर्भात असून, उमेदवारांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीसाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. यासंदर्भात सुरुवातीची अधिसूचना १२ मार्च २०२५ रोजी www.joinindianarmy.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्ज करण्यासाठीची विंडो १० एप्रिलपर्यंत खुली होती. उमेदवारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही मुदत आता दि.२५पर्यंत वाढवण्यात आली आहे,असे सेना भरती कार्यालयाच्या वतीने कळविण्यात आले.

## शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमाअंतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांचा विविध कामगार संघटना, जिल्हा व्यापारी असोसिएशनशी संवाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमा अंतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी विविध काम गार संघटना, जिल्हा व्यापारी असोसिएशन यांच्याशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेत अडचणी सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीवेळी सहायक कामगार आयुक्त श्री. युवराज पडीयाल तसेच माथाडी मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

कामगार प्रतिनिधिनी विशेष करून औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचे मुद्दे मांडले. अनेक कारखान्यांमध्ये कंत्राटी कामगारांना किमान वेतन, बोनस इत्यादी नियमानुसार मिळत नाही तसेच वर्षानुवर्षे काम करून कामगाराना कंपनीमध्ये कायम केले जात नाही. तसेच संघटना स्थापन केल्यास मालक वर्गाकडून त्रास दिला जातो. कामगारांना नियमबाह्य कमी केले जाते.

माथाडी कामगारांचे देखील विविध प्रश्न आहेत त्यांची सोडवणूक झाली पाहिजे तसेच निरीक्षणाचे अधिकार पुन्हा कामगार अधिकारी यांना प्राप्त झाले पाहिजेत तसेच कामगार कार्यालयात सोई सुविधा नसल्याने त्या कार्यालयास इतर ठिकाणी जागा मि



ळावी असे मुद्दे उपस्थित केले.

सहायक कामगार आयुक्त यांनी विविध कामगार कायद्यातील कामगार विषयक तरतुदी निदर्शनास आणून दिल्या. व्यापारी असोसिएशनच्या प्रतिनिधीनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर भारतामध्ये उद्योगासाठी प्रसिद्ध होत आहे त्यामुळे येथील औद्योगिक वातावरण हे कामासाठी पोषक आहे अशी प्रतिमा निर्माण करणे ही इथल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

तसेच व्यापऱ्यांना ट्रक उभा करण्यासाठी ट्रक टर्मिनलसाठी जागा मिळाली पाहिजे तसेच दिवसा कमी रहदारीच्या वेळेत मालवाहतूक ट्रकांना मोंढा मध्ये प्रवेश मिळावा अशी मागणी केली. यावर बैठकीमध्ये सर्व मुद्दाबाबत सविस्तर चर्चा झाली.

विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी बैठकीच्या प्रत्येकाचे म्हणणे एकल्यानंतर याबाबत संबंधित विभागांशी व त्यांचे विभाग प्रमुखांशी चर्चा करून समन्वयाने प्रश्न सोडविणे बाबत पत्रव्यवहार करण्यात येईल व या विभागाची औद्योगिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहील व उद्योगासाठी अत्यंत चांगले वातावरण या शहरांमध्ये निर्माण होईल यासाठी प्रशासन नेहमी तत्पर राहील असे सांगितले. यावेळी संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' गावे पाणीदार बनवा; जनजागृतीसाठी 'जलरथ' रवाना

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेच्या अंमलबजावणीतून गावे पाणीदार बनविण्यासाठी जनजागृती करणारा जलरथ आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झेंडी दाखवून रवाना करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातून आज सकाळी हा जलरथ रवाना झाला. शासनाच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. गावातील जलाशयांमधील गाळ काढुन तो शेतांमध्ये टाकला जावा,




त्यातून जमिनीची उत्पादकता वाढावी व जलाशयांची साठवण क्षमता वाढावी, नाल्यांची वहन क्षमता वाढावी यासाठी ही योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी आवश्यक यंत्रसामुग्री, इंधन इ. बाबींचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी या योजनेचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा व आपले गाव पाणीदार बनवावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यानिमित्त केले. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, भारतीय जैन संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष गौतम संचेती, राज्य महासचिव प्रवीण पारख, प्रकल्प प्रमुख किशोर ललवाणी, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पगारिया, पारस चोरडिया, सफल रायसोनी, अभिजीत हिरप, सतीश लोढा, अविनाश डोढल, पल्लवी डोढल, निकेतन कोठारी, सुनील लोढा, मनीष बनसोड यांची उपस्थिती होती . त्याचप्रमाणे मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, कैलास पाटील बहुउद्देशीय संस्था, ज्योती फाउंडेशन यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# हिंदू राष्ट्राच्या मागणीसाठी नेपाळमध्ये आक्रोश

'गर्व से कहो हम हिंदू है' असा जयघोष काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपण ऐकतो. भारत हा हिंदू राष्ट्र व्हावा अशी इच्छा असलेला मोठा वर्ग आपल्या देशात आहे. या हिंदुत्ववादी विचारांच्या आधारावर काम करणाऱ्या भाजपाला केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तीन वेळा सत्ता मिळाली. भारतातील हिंदूंना आपली बाजू ठामपणे मांडणारा पक्ष हवा होता. ती पोकळी भरून काढण्यात भाजपाला यश आले, असे म्हणायला हरकत नाही. त्यातूनच, अयोध्येतील राम मंदिराचा गेले अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न असो नाही, तर कश्मीरमधील ३७० कलमाचा मुद्दा असो. शेजारील देशांनीही असे ठळक मुद्दे मोदी सरकारच्या कार्यकाळात कसे निकाली निघाले, हे पाहता आले आहे. नेपाळ हा भारताचा शेजारील मित्र राष्ट्र ओळखला जातो. ८१ टक्के हिंदू लोकसंख्या असलेल्या नेपाळमध्ये सध्या सुरू झालेल्या हिंदू राष्ट्राच्या नवीन आंदोलनामुळे त्याला जगभर प्रसिद्धी मिळत आहे. राजेशाही पुन्हा आणावी, हिंदू राष्ट्र घोषित करावे, यासाठी मोठ्या संख्येने समर्थक रस्त्यावर उतरत आहेत. माजी राजे ज्ञानेंद्र शाह यांना पुन्हा राजगादीवर बसवावे या मागणीला जोर धरला आहे.

नेपाळमधील २४० वर्षे जुन्या हिंदू राजेशाहीचे अस्तित्व नेपाळ संसदेने २००८ मध्ये समाप्त केले होते. नेपाळला धर्मनिरपेक्ष सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले होते. राजे ज्ञानेंद्र शाह यांना





परागंदा व्हावे लागले होते. अर्थात हा सर्व प्रकार चीनच्या इशाऱ्यावरून करण्यात आला. भारताचा एक मित्रराष्ट्र कमी करण्याचा चीनचा सुप्त हेतू होता. नेपाळची सत्ता उलटून लावण्यासाठी १९९० सालापासून नेपाळमध्ये धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याची मागणी जोर धरली होती; परंतु ही कार्यकारी राजेशाही उलथून संविधानिक राजेशाहीसह संसदीय लोकशाही स्थापित करण्यासाठी १८ वर्षांचा काळ लोटला गेला.

नेपाळमध्ये हिंदू, बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चन आणि इतर अनेक धार्मिक समुदाय आहेत. नेपाळ हा जगातील एकमेव असा देश आहे, जिथल्या लोकसंख्येत हिंदूंचा टक्का भारतापेक्षा अधिक आहे. या देशात अनेक सुंदर आणि स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेली मंदिरे आहेत. नेपाळची सांस्कृतिक आणि धार्मिक ओळख वाचवण्यासाठी राजेशाही आवश्यक आहे. जनता धर्मनिरपेक्ष सरकारवर खूश नाही, असा आंदोलनकर्त्यांचा दावा आहे. अनेक पौराणिक कथांशी नेपाळची जनता आजही स्वत:ला जोडू पाहते. एका कथेनुसार, भगवान विष्णूने नेपाळी लोकांना संघटित केले होते आणि त्यांना त्यांचा ध्वज दिला होता, ज्यावर सूर्य आणि चंद्र असे प्रतीक होते. इतिहासकाराच्या मते, नेपाळ या नावाची सुरस कथाही आहे. ङ्गनेङ्घ नावाच्या एका हिंदू ऋषीने प्रागैतिहासिक काळात काठमांडूच्या खोऱ्यात स्वतःची स्थापना केली. ङ्गनेपाळङ्घ या शब्दाचा अर्थ म्हणजे ङ्गने ऋषींनी संरक्षित केलेले स्थान (संस्कृतमध्ये ङ्गपालङ्घ)ङ्घ असा होतो. त्यांनी बागमती आणि विष्णुमती नद्यांच्या संगमावर असलेल्या टेकू येथे धार्मिक विधी केले. पौराणिक कथेनुसार, त्यांनी गोपाल राजवंशातील अनेक राजांपैकी पहिला म्हणून एका धार्मिक गोपाळाची निवड केली. या शासकांनी नेपाळवर ५०० वर्षांहून अधिक काळ राज्य केले. गोपाल राजवंशाच्या वंशातील पहिला राजा म्हणून भुक्तमानची निवड केली.

गोपाल राजवंशाने ६२१ वर्षे राज्य केले. यक्ष गुप्त हा या राजवंशाचा शेवटचा राजा होता. १८ व्या शतकाच्या मध्यात, पृथ्वी नारायण शाह या गुरखा राजाने सध्याचे नेपाळ बनलेले राज्य एकत्र करण्यासाठी मोहीम आखली होती. त्याने सीमावर्ती पर्वतीय राज्यांची तटस्थता सुनिश्चित करून आपले ध्येय गाठले. अनेक रक्तरंजित लढाया आणि वेढा घालण्यानंतर, विशेषतः कीर्तिपूरची लढाई १७६९ मध्ये काठमांडू खोरे जिंकण्यात यश मिळवले होते. हिंदू धर्म हा नेपाळचा सर्वात मोठा धर्म आहे. काठमांडू खोऱ्यावरील गुरखाली विजयानंतर, राजा पृथ्वी नारायण शाह यांनी पाटणमधून ख्रिश्चन मिशनऱ्यांना हाकलून लावले आणि नेपाळला अस्सल हिंदुस्थान असे नाव दिले होते. गुरखाली राजा पृथ्वी नारायण यांच्या काठमांडू खोऱ्यावरील विजयानंतर, उच्च वर्गीकरणाचे हिंदू धागे परिधान केलेल्या तगधारींना नेपाळच्या राजधानीत विशेषाधिकार प्राप्त झाले होते. तसेच केंद्रीय सत्तेतही अधिक सहभाग मिळाला होता. तेव्हापासून हिंदू करण हे नेपाळ राज्याचे महत्त्वाचे धोरण बनले होते.

नेपाळी समाज त्याच्या आंतरधर्मीय धार्मिक सौहार्द आणि सहिष्णुतेसाठी ओळखला जात असला तरी पृथ्वी नारायण शाह यांनी नेपाळच्या हिंदू करणासाठी इतर धार्मिक समुदायांवर छळ केल्याचा इतिहास आहे. त्यानंतर नेपाळमध्ये १९४०पर्यंत हिंदू धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्माचा प्रसार करण्यास मनाई होती.

नेपाळच्या नव्या राज्यघटनेनुसार, तो धर्मनिरपेक्ष राज्य आहे. कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य देत नाही, असा उल्लेख आहे. यामुळेच नेपाळमध्ये धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याचा प्रयोग यशस्वी झाला नाही, कारण नेपाळच्या राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेची व्याख्या 'अनादी काळापासून चालत आलेल्या धर्म आणि संस्कृतीच्या संरक्षणासह धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य' अशी केली आहे, जी हिंदू धर्माला विशेष स्थान देत आहे. त्यामुळे, राज्यघटनेत धर्मनिरपेक्ष राज्याचा दर्जा देत लोकशाही प्रक्रियेतून सरकार स्थापन करण्यात येत असले तरी जनतेला राजेशाहीचा मुकुट हवा आहे. त्याचबरोबर रस्त्यावर उतरलेली जनता पुन्हा हिंदू राष्ट्राची निर्मिती करण्यात यशस्वी ठरते का हे पाहावे लागेल.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**